स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा- ॥ अंतर्गत, वैयक्तिक तसेच सार्वजनिक स्तरावर घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनबाबत गाव निवडीचे निकष व सर्वसाधारण कार्यालयीन पद्धतीबाबत मार्गदर्शक सूचना.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन शुद्धिपत्रक क्रमांक :-स्वभामि २०२१/प्र. क्र. २७२ (१) /पापु-१६**
७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, क्रॉफर्ड मार्केट,मंत्रालय,मुंबई- ४०० ००१
**दिनांक :- ०४ /११/२०२२.**

वाचा:-

१) **पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक :** स्वभामि-२०२१/ प्र. क्र.२७२ (१)/ पापु-१६, दिनांक २६ नोव्हेंबर, २०२१.

२) **पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक:** स्वभामि-२०२१/प्र.क्र.२७२(१) /पापु-१६, दिनांक १०जानेवारी, २०२२.

३) **केंद्र शासनाचे पत्र क्रमांक:** S-११०११/२/२०२०-SBM -DDWS (Part-१), दिनांक १७ जानेवारी, २०२२

४) **केंद्र शासनाचे पत्र क्रं केंद्र शासनाचे पत्र क्रमांक :** S-११०११/३/२०२०-SBM-DDWS-Part-I (१), दिनांक ०१ ऑगस्ट, २०२२.

## शासन शुद्धिपत्रक

उपरोक्त वाचा क्रमांक २ येथील शासन शुध्दीपत्रक अधिक्रमित करण्यात येत आहे.

२. उपरोक्त वाचा क्रमांक १ येथील शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ३ (I) ऐवजी कृपया खालीलप्रमाणे वाचावे:-

**३. उपरोक्त उपांगाकरिता निधी अनुज्ञेयता:-**

**I) घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन**

| सन २०२१ नुसार लोकसंख्या | स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-॥ नुसार अनुज्ञेयता | |
|---|---|---|
| | घनकचरा व्यवस्थापन | सांडपाणी व्यवस्थापन |
| ५००० पर्यंत | रू.६०/- प्रती व्यक्ती | रू.२८०/- प्रति व्यक्ती |
| ५००० पेक्षा जास्त | रू.४५/- प्रती व्यक्ती | रू.६६०/- प्रति व्यक्ती |

घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनांतर्गत घेण्यात येणा-या उपांगांची मजूरीसह अंदाजपत्रकीय किंमत, स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-॥ अनुज्ञेय किंमतीच्या मर्यादेपर्यंत असल्यास, घनकचरा व सांडपाणी

व्यवस्थापनाच्या उपांगाची अंमलबजावणी करताना, लागणारी मजूरी, ही स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-II अनुज्ञेय निधी मधून भागविण्यात यावी. ( जर गावाकरिता एकंदर अनुज्ञेयता, रू. ०.५० लक्ष पेक्षा कमी असेल तर, किमान एकंदर अनुज्ञेयता रु. ०.५० लक्ष समजावी. )

तथापि घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनांतर्गत घेण्यात येणा-या उपांगांची मजूरीसह अंदाजपत्रकीय किंमत, स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-II अनुज्ञेय किंमतीपेक्षा जास्त असल्यास, अशा उपांगांसाठी अनुज्ञेयतेपेक्षा जास्त लागणा-या रक्कमेपैकी मजूरीचा वा वाढीव खर्च इतर स्रोतातून जसे आमदार निधी, मनरेगा, १५ वित्त आयोग (स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-II अंतर्गत अनुज्ञेय ३०% व्यक्तिरिक्त)इत्यादी मधून करण्यात यावा. सदर निधी अनुज्ञेयता गावाच्या सन २०२१ च्या लोकसंख्येसाठीच्या सार्वजनिक उपांगाकरिता अनुज्ञेय राहील. (केंद्र शासनाचे पत्र क्र:S-११०१५/१/२०२०-SBM-DDWS, दिनांक २८/०५/२०२० अन्वये दिलेल्या निर्देशानुसार सन २०२१ ची लोकसंख्या परिगणना करून घनकचरा, सांडपाणी व्यवस्थापन व मैला गाळ व्यवस्थापनाच्या प्रकल्पाकरिता निधी अनुज्ञेयतेसाठी गृहीत धरावी. - याकरिता “प्रपत्र-१४” नुसार गणना करता येईल. )

गावातील घनकचरा व्यवस्थापन या उपांगासाठी अनुज्ञेय निधीमधून होणारी बचत त्याच गावातील सांडपाणी व्यवस्थापनासाठी तर, गावातील सांडपाणी व्यवस्थापन या उपांगासाठी अनुज्ञेय निधीमधून होणारी बचत त्याच गावातील घनकचरा व्यवस्थापनासाठी वापरता येईल.

४. उपरोक्त वाचा क्रमांक १ येथील शासन निर्णयातील परिच्छेद ३- उपरोक्त उपांगाकरिता निधी अनुज्ञेयता या शिर्षाखाली (III) प्लास्टिक कचरा व्यवस्थापन:- प्रत्येक तालुक्यामध्ये एका युनिट करिता रू. १६ लक्ष, यापुढील परिच्छेदात पुढीलप्रमाणे अंतर्भूत करण्यात यावे:-

“एका तालुक्यातील प्लास्टिक कचरा व्यवस्थापन केंद्र (PWMU) साठी अनुज्ञेय निधीमधून होणारी बचत, आवश्यकतेनुसार दुसऱ्या तालुक्यातील प्लास्टिक कचरा व्यवस्थापन केंद्र (PWMU) यासाठी वापरता येईल. तसेच, आवश्यकतेनुसार एकापेक्षा जास्त तालुक्यांसाठी, अनुज्ञेय एकत्रित निधीमधून, क्लस्टर पध्दतीने प्लास्टिक कचरा व्यवस्थापन केंद्र (PWMU) घेता येईल”

५. तसेच, उपरोक्त वाचा क्रमांक १ येथील शासन निर्णयातील परिच्छेद ४ (VIII) (अ) पुढीलप्रमाणे वाचण्यात यावा:- “गावस्तरीय, तालुका/जिल्हास्तरीय प्रकल्प अमंलबजावणी दरम्यान प्रत्यक्षात पूर्ण करण्यात आलेल्या कामांच्या गुणवत्तेची तपासणी, त्रयस्थ यंत्रणा म्हणून, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मीत्रा-नाशिक, नीरी-नागपूर, उन्नत महाराष्ट्र अभियानामध्ये सहभागी संस्था, महाराष्ट्रातील कोणत्याही जिल्ह्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जिल्हयांमध्ये शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय नसल्यास, महाराष्ट्रातील कोणत्याही जिल्ह्यातील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय, विश्वेश्वरैया प्रादेशिक अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर (VRCE), कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, पुणे (COEP) व

राज्यस्तरावर यासाठी वेळोवेळी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने नेमून दिलेल्या विविध यंत्रणा यांच्याकडून उप अभियंता, उप विभाग, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद यांनी करून घ्यावी. असे करतांना एकत्रित गावांचे तपासणीचे नियोजन करून तपासण्या घ्याव्यात व तपासण्यात त्रयस्थ यंत्रणेच्या व उपस्थित केलेल्या शेऱ्यांची पूर्तता करावी. त्रयस्थ यंत्रणेद्वारे करावयाच्या कामाच्या तपासणीसाठी, स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-II अंतर्गत अनुज्ञेय निधीच्या ०.५०% तपासणी शुल्क म्हणून अनुज्ञेय राहिल. (उन्नत महाराष्ट्र अभियानामध्ये सहभागी संस्थाच्या अनुषंगाने उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा शासन निर्णय क्रमांक: धोरण ३०११/४५) तांशि-२, दिनांक ५ जुलै, २०१७ नुसार देण्यात आलेले निर्देश सदर संस्था निवडताना विचारात यावेत.) ”

तसेच, यापुढे राज्यातील १५०० पेक्षा कमी लोकसंख्या असणा-या गावांमधील कामांची, उपरोक्तनुसार त्रयस्थ यंत्रणेद्वारे तपासणी न करता, संबंधित पंचायत समिती व्यतिरिक्त, त्याच जिल्ह्यातील अन्य पंचायत समितीमध्ये कार्यरत उप अभियंता यांचेकडून देखिल संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या मान्यतेने तपासणी करून घेता येईल. या अधिका-यांना त्यासाठी शासन नियमांनुसार दैनिक भत्ता व प्रवास भत्ता अनुज्ञेय राहील.

६. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक २०२२११०४११०९५०२०२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

CHANDRAKANT KRISHNA MORE

Digitally signed by CHANDRAKANT KRISHNA MORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER SUPPLY AND SANITATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=11ac200219edb36f7777ee1101657bea4271090267228122b638d6f2cdedad62, pseudonym=268C7E15F99BF8B492638E14751A661EBCF0233F, serialNumber=2314CF333E070F9936792BC95890FA89B2F617A931B2B577B703FA858F3DF433, cn=CHANDRAKANT KRISHNA MORE
Date: 2022.11.04 13:11:17 +05'30'

**( चं. कृ. मोरे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. सर्व मा. मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४. विधानसभा व विधानपरिषद सदस्य.
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व,मंत्रालयीन विभाग, मुंबई.
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
८. जिल्हा परिषद अध्यक्षा/अध्यक्ष ,सर्व.

९. सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
११. सहसचिव (स्वभामि), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व.
१३. प्रकल्प संचालक (स्वभामि), राज्य पाणी व स्वच्छता अभियान, बेलापूर, नवी मुंबई.
१४. उपायुक्त (विकास), सर्व.
१५. जिल्हा समन्वयक (स्वच्छ भारत अभियान-ग्रामीण) तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) , जिल्हा परिषद सर्व.
१६. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद सर्व, यांनी या शासन निर्णयाच्या छायाप्रती प्रत्येक पंचायत समिती सभापती /उपसभापती व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना द्याव्यात व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी प्रत्येक पंचायत समिती सदस्य, सरपंच यांना द्याव्यात.
१७. कार्यकारी अभियंता/उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग/उप विभाग सर्व.
१८. संचालक, मित्रा- नाशिक/ नीरी-नागपूर/उन्नत महाराष्ट्र अभियानामध्ये सहभागी संस्था.
१९. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, महाराष्ट्र राज्य/विश्वेश्वरैय्या प्रादेशिक अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर (VRCE)/ कॅालेज ऑफ इंजिनियरिंग, पुणे (COEP).
२०. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.
२१. संगणक समन्वयक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी सदरचा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, राज्य पाणी व स्वच्छता अभियान, बेलापूर व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करावा तसेच वरील सर्वांना ई-मेल द्वारेही पाठवावा.
२२. कार्यासन ( पापु-१६ ), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई. ( निवडनस्ती ).